मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क साधा.
9834138482

www.newsexpressmarathi.in » पुणे- पिंपरी-चिंचवड »शनिवार, दि. 23 मार्च 2024

# भाजपकडून आचारसंहितेचा भंग

## राष्ट्रवादी शरद पवार गटाचे शहराध्यक्ष तुषार कामठे : सार्वजनिक ठिकाणी भिंतींवर 'कमळ' चित्रावर आक्षेप

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहरात शेकडो सार्वजनिक ठिकाणी भिंतींवर भाजपचे चिन्ह कायमस्वरूपी रंगविण्यात आले असून ते तात्काळ मिटविण्यात यावे, तसेच संबंधित दोषींवर कारवाई करावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाचे पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष तुषार कामठे यांनी महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह यांच्याकडे केली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) यांच्यावतीने शहराध्यक्ष तुषार कामठे यांनी आयुक्त शेखर सिंह यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, "देशभरात लोकसभा निवडणुका जाहीर झाल्या असून आदर्श आचारसंहिता घोषित करण्यात आली आहे, त्या पार्श्वभूमीवर शहरात महानगरपालिका प्रशासनाकडून राजकीय पक्ष चिन्ह नावे इत्यादी झाकण्याचे तसेच राजकीय जाहिरात होर्डिंग फ्लेक्स काढण्याचे काम करण्यात येत आहे.

आम्ही आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, गेल्या काही दिवसांपासून भारतीय जनता पक्षाकडून शहरभरात शेकडो सार्वजनिक ठिकाणी भिंतींवर पक्षाचे चिन्ह कायमस्वरूपी रंगविण्यात आल्याचे पाहायला मिळते. त्याकडे महापालिका प्रशासन दुर्लक्ष करत असून त्यामुळे आदर्श आचारसंहितेचे थेटपणे उल्लंघन होत आहे.




**मतदारांना आता तक्रार करण्याची सुविधा...**

भारत निवडणूक आयोगाने लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या तारखा जाहीर केल्या आहेत. या निवडणुका एकूण सात टप्प्यात होणार असून त्यासाठी मागच्या शनिवारपासून देशभरात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. या निवडणूक कालावधीत आचारसंहितेचे उल्लंघन होत असल्यास सर्वसामान्य मतदार नागरिकांना आता थेट निवडणूक आयोगाकडे तक्रार करता येणार आहे. त्यासाठी भारत निवडणूक आयोगाने सीव्हिजिल सिटीझन ॲप विकसित केले आहे. या ॲपवर दाखल होणाऱ्या तक्रारींवर पहिल्या १०० मिनिटांत पहिली कार्यवाही केली जात आहे.



> शहरात ज्या ज्या ठिकाणी असे पक्ष चिन्ह व नाव रंगविण्यात आले आहे ते महापालिका प्रशासन तथा निवडणूक विभागाकडून तात्काळ मिटविण्यात यावे, शिवाय आचारसंहिता भंगाच्या घटना घडणार नाहीत याकडे कुठल्याही राजकीय पक्षाचा अभिनिवेश किंवा दबाव न बाळगता कारवाई करावी.
>
> **- तुषार कामठे, शहराध्यक्ष, राष्ट्रवादी (शरद पवार गट)**

आचारसंहिता उल्लंघनाची तक्रार किंवा माहिती निवडणूक आयोग आणि जिल्हा प्रशासनापर्यंत पोहोचवण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने सीव्हिजिल ॲप विकसित केले आहे. या मोबाईल ॲपद्वारे मतदारांना आता थेट आयोगाकडे तक्रार करता येणार आहे. या सीव्हिजिल ॲपवर तक्रार प्राप्त होताच तातडीने त्यावर कारवाई केली जाते. तक्रारदाराचे नाव गोपनीय ठेवले जाते.

# बायोगॅसपासून सीएनजी निर्मितीचा प्रकल्प

## महापालिकेच्या इंधन खर्चामध्येही बचत होणार : पुढील 30 वर्षांचा विचार करून प्रकल्पाची उभारणी, 50 टन प्रतिदिन क्षमता

**पिंपरी । प्रतिनिधी**

हॉटेलमधील कचऱ्यावरील प्रक्रियेसाठी मोशी येथे स्वच्छ भारत योजनेतून बायोगॅस प्रक्रिया प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला आहे. हॉटेलमधून गोळा होणाऱ्या ओल्या कचऱ्यापासून बायोगॅसची निर्मिती करण्यात येणार आहे. बायोगॅसची निर्मिती झाल्यानंतर या बायोगॅसपासून सीएनजीची निर्मिती करून हा सीएनजी कचरा वाहतुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या वाहनांसाठी इंधन म्हणून वापरण्यात येणार आहे. यामुळे महापालिकेच्या इंधन खर्चामध्येही बचत होणार आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात गोळा होणाऱ्या कचऱ्याची शास्त्रोक्त



पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी महापालिकेच्या वतीने विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. हॉटेल, रेस्टॉरंट किंवा विविध भागांतून मोठ्या प्रमाणात ओला कचरा निर्माण होत आहे. त्यावर प्रक्रिया करण्यासाठी महापालिकेकडे स्वतंत्र अशी व्यवस्था नव्हती. या समस्येवर उपाय म्हणून महापालिकेच्या वतीने मोशी येथे स्वच्छ भारत योजनेतून बायोगॅस प्रक्रिया प्रकल्प उभारण्यात आला आहे.

सद्यस्थितीत महापालिका कार्यक्षेत्रात ३५ ते ३८ टन हॉटेल वेस्ट निर्माण होत आहे. या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी ५० टन प्रतिदिन क्षमतेचा बायोगॅस प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला आहे. पुढील ३० वर्षांचा विचार करून भविष्यात या प्रकल्पाची क्षमता २०० टन प्रतिदिन इतकी वाढविण्याची तरतूद करण्यात आली आहे. यामुळे परिसरातील दुर्गंधी कमी होण्यास मदत मिळणार असून हॉटेल वेस्ट तसेच ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यात येत आहे.

या प्रकल्पाद्वारे महापालिकेने शहर शून्य कचरा होण्याच्या दिशेने पाऊल टाकल्याचे आयुक्त शेखर सिंह म्हणाले. पर्यावरणाचे संतुलन टिकवून ठेवण्यासाठी बायोगॅस हा योग्य पर्याय आहे. कचरा वाहतुकीची सर्व वाहने याच प्रकल्पातून तयार होणाऱ्या इंधनावर चालविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. तसेच या प्रकल्पातून तयार होणारा सीएनजी खुल्या बाजारात विक्रीसाठीही उपलब्ध होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

**प्रकल्पाची उद्दिष्ट्ये...**

शहरातील हॉटेल, खाणावळी, मंगल कार्यालय, उपाहारगृहातून गोळा होणारा ओला कचरा विशेष 'जीपीएस' यंत्रणा असणाऱ्या बंदिस्त गाडीतून संकलित केला जाणार आहे. विलगीकरण करून प्रक्रिया केली जाणार आहे. सद्यस्थितीत प्रकल्पाची क्षमता 50 टन प्रतिदिन इतकी असून, टप्प्याटप्प्याने 200 टन प्रतिदिनपर्यंत वाढविली जाणार आहे. बायोगॅसपासून सीएनजी बनविला जाणार आहे.

# पुण्यात काँग्रेसचा 'कसबा पॅटर्न'

## भाजपच्या पहिलवानाला अस्मान दाखविण्यासाठी धंगेकरांना उमेदवारी : धंगेकर यांच्या कार्यकर्त्यांचा जल्लोष

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे शहर लोकसभा मतदारसंघासाठी अखेर काँग्रेसने आमदार रवींद्र धंगेकर यांना संधी दिली. धंगेकर यांच्या निमित्ताने पुन्हा एकदा 'कसबा पॅटर्न' संपूर्ण शहरात राबवून हक्काचा मतदारसंघ ताब्यात घेण्यासाठी भाजपच्या पहिलवान उमेदवाराला काँग्रेस अस्मान दाखविणार का? याची उत्सुकता निर्माण झाली आहे.

उमेदवारीसाठी शहर काँग्रेसकडे इच्छुकांची मोठी रांग लागली होती. धंगेकर यांच्यासह माजी आमदार मोहन जोशी, शहराध्यक्ष अरविंद शिंदे, बाळासाहेब शिवरकर, आबा बागूल, अभय छाजेड यांच्यासह २० जण इच्छुक होते. शहर काँग्रेसने सर्व इच्छुकांची नावे प्रदेश काँग्रेसकडे पाठविली होती.

गेल्या दोन ते तीन दिवसांमध्ये उमेदवारी मिळविण्यासाठी जोशी, शिंदे आणि धंगेकर यांच्यात जोरदार रस्सीखेच सुरू होती. त्यामुळे कोणाच्या गळ्यात उमेदवारीची माळ पडेल? याबाबत उत्सुकता होती. या स्पर्धेत उमेदवारी मिळविण्यात धंगेकरांना अखेर यश आले. पक्षाने गुरुवारी त्यांच्या नावाची अधिकृत घोषणा केली. त्यानंतर धंगेकर यांच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष केला. धंगेकर यांच्या उमेदवारीने निवडणुकीत रंग भरणार असल्याचे स्पष्ट झाले.




कसब्याच्या आमदार मुक्ता टिळक यांचे वर्षभरापूर्वी निधन झाले. त्यावेळी झालेल्या पोटनिवडणुकीत काँग्रेसने धंगेकरांना संधी दिली. भाजपचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जाणारा कसबा मतदारसंघ धंगेकर यांच्या निमित्ताने आपल्याकडे खेचून आणण्यात काँग्रेसला यश आले. त्याचा अप्रत्यक्ष फायदा धंगेकर यांनाही झाला. या पोटनिवडणुकीकडे राज्याचे नव्हे, तर संपूर्ण देशाचे लक्ष लागून होते. सर्व ताकद लावूनही भाजपला निवडणुकीत यश मिळविता आले नाही.

### काँग्रेसला धंगेकरांच्या इमेजचा फायदा...

कसबा पोटनिवडणुकीत काँग्रेसबरोबरच एकसंध राष्ट्रवादी काँग्रेस आणि फुटलेली शिवसेना होती. परंतु या सर्वांची एकत्रित ताकद आणि काम करणारा कार्यकर्ता म्हणून धंगेकर यांच्या 'इमेज'चा फायदा झाला आणि ते विजयी झाले. मात्र गेल्या वर्षभरात पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले आहे. पोटनिवडणुकीत शिवसेना फुटीचा पुणे शहरातील संघटनेवर फारसा परिणाम दिसला नाही.

दरम्यानच्या कालवधीत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये उभी फूट पडली. त्याचा परिणाम शहर राष्ट्रवादी काँग्रेसवर झाला आहे. अजित पवार समर्थक कार्यकर्त्यांची मोठी संख्या पुण्यात आहे. त्यामुळे पोटनिवडणुकीतील परिस्थिती आणि आता होणाऱ्या लोकसभा निवडणुकीतील राजकीय परिस्थितीत मोठा बदल झाला आहे. भाजपने माजी महापौर मुरलीधर मोहोळ यांना उमेदवारी दिली आहे.

धंगेकर यांच्या उमेदवारीने 'मोहोळ विरुद्ध धंगेकर' अशी सरळ लढत होणार असल्याचे सध्या तरी चित्र आहे. या सर्व पार्श्वभूमीवर कसब्यातील पोटनिवडणुकीप्रमाणेच लोकसभा निवडणुकीतही चमत्कार घडवून दाखविण्याची जबाबदारी धंगेकर यांच्यावर आली आहे. त्यात ते कितपत यशस्वी होतात हे येणारा काळाच सांगेल.

### धंगेकर यांचा राजकीय प्रवास...

पुणे महापालिका निवडणूक 1997 मध्ये शिवसेनेकडून विजयीपुणे महापालिका निवडणूक 2002 मध्ये शिवसेनेकडून विजयीपुणे महापालिका निवडणूक 2007 मध्ये मनसेकडून विजयी
पुणे महापालिका निवडणूक 2012 मध्ये मनसेकडून विजयी
पुणे महापालिका निवडणूक 2017 मध्ये काँग्रेस पुरस्कृत उमेदवार विजयी
कसबा विधानसभा पोटनिवडणूक 2023 मध्ये काँग्रेसकडून विजयी

# ऐन उन्हाळ्यात नाझरे धरणाने गाठला तळ!

## धरणावरील पिण्याच्या पाण्याच्या योजना अडचणीत : पुढील तीन महिने तरी तीव्र पाणीटंचाई जाणवणार

**जेजुरी । प्रतिनिधी**

ऐन उन्हाळ्यात जेजुरीजवळील नाझरे धरणाचे (मल्हार सागर) पाणी तळाशी गेले आहे. धरणात फक्त गाळमिश्रित पाण्याचा डोह दिसत आहे. त्यामुळे धरणावरील पिण्याच्या पाण्याच्या योजना सध्या अडचणीत आल्या आहेत. किमान तीन महिने तरी या परिसरातील गावांच्या पिण्याचे पाण्याचे नियोजन करावे लागणार आहे.

नाझरे धरणामधून परिसरातील सुमारे पन्नास गावांना पाणीपुरवठा केला जातो. नाझरे धरणाची पाणी साठवण क्षमता ७८८ दशलक्ष घनफूट असून, यंदा धरणात अल्प प्रमाणात पाणी आहे. गेल्या दोन महिन्यांपासून धरणात उपयुक्त पाणीसाठा शून्य आहे. डोहातील पाणी तळाशी गेले आहे. त्यामुळे धरणावरून मोरगाव प्रादेशिक व माळशिरस प्रादेशिक पाणी योजना बंद आहेत. नाझरे प्रादेशिक व कोळविहिरे प्रादेशिक या योजना धरणातील गाळमिश्रित पाणी शुद्धीकरण करून काही प्रमाणात चालु आहेत.



जेजुरी नगरपालिकेसाठी सध्या मांडकी योजनेवरून पाणीपुरवठा सुरू आहे. मात्र शहरात तीन ते चार दिवसांनी पिण्याचे पाणी येते. पुढील तीन महिने तरी तीव्र पाणीटंचाई जाणवणार आहे. त्यासाठीचे नियोजन करावे लागणार आहे. जनावरांच्या पाण्याचा व चाऱ्याचा प्रश्न सोडवावा लागणार आहे. परिसरातील विहिरीही ताब्यात घेण्याची तयारी ठेवावी लागणार आहे.

### धरणातील गाळ काढण्याची गरज

नाझरे धरणातील पाणी तळाशी गेल्याने धरणातील गाळ काढण्याच्या कामाची मोठी संधी आहे. धरणाचे खोलीकरण केल्यास पाणीसाठा २५ टक्क्यांनी वाढू शकतो. धरणात मध्यभागी सुमारे पाच ते दहा फुटापर्यंत गाळ आहे. हा गाळ काढण्यासाठी नियोजन करण्याची गरज आहे. धरणाच्या परिसरात काही भागात माती व मुरुमाचे ढीग आहेत. त्यामुळे या परिसरात खोलीकरण केल्यास टंचाई काळात परिसरातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कमी होऊ शकतो.


### जेजुरीसाठी वीर धरणातून पाणीयोजना व्हावी

जेजुरी हे तिर्थक्षेत्र आहे. जेजुरीची लोकसंख्याही तीस हजारांच्या पुढे गेली आहे. नागरिकांबरोबरच भाविकांनाही पाणी पुरवावे लागते. जेजुरीसाठी नीरा नदीवरील मांडकी डोह येथून पिण्याच्या पाण्यासाठी योजना आहे. मात्र या योजनेचे काम व्यवस्थित न झाल्याने या योजनेची पाइपलाइन वारंवार फुटते. त्यामुळे ही योजना जास्त दिवस बंद असते. मांडकी डोहातही पाण्याचा कधी कधी तुटवडा असतो. त्यामुळे योजना असूनही पाणीटंचाईचा सामना करावा लागतो. त्यासाठी वीर धरणातून कायमस्वरूपी पाणी मिळेल, अशी योजना होणे आवश्यक आहे.




# रसवंतीगृहे पदपथावर; चालणे कठीण

## पादचाऱ्यांनी चालायचे कोठून ? : कारवाईसाठी महापालिका हतबल; पोलिसांची केवळ बघ्याची भूमिका



**पिंपरी । प्रतिनिधी**

संत तुकारामनगरमधील पदपथावर रसवंतीगृह थाटलेली आहेत. पदपथच नाही; तर रस्त्यावरही अतिक्रमण केल्याने पादचाऱ्यांनी चालायचे कोठून ? असा प्रश्न निर्माण झाला आहे. या पदपथावर दिवाळीत फटाक्यांचे स्टॉल, गणेशोत्सवात गणेश मूर्ती स्टॉल आता उन्हाळ्यात अनधिकृतपणे रसवंतीगृह सुरू केले आहेत.

महेशनगर ते वल्लभनगर या भागातील पदपथावर काही मीटर अंतरावर दहाहून अधिक रसवंतीगृह थाटलेली दिसून येत आहेत. रसवंतीगृह चालकांनी पदपथ अक्षरशः ताब्यात घेतल्याचे तर कारवाईसाठी महापालिका हतबल असल्याचे दिसून येत आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्यावतीने संत तुकारामनगरमधील रस्त्यांचे प्रशस्त रुंदीकरण करण्यात आले आहे. त्यालगत पादचाऱ्यांसाठी सुंदर असे पेव्हिंग ब्लॉक्सचे पदपथ तयार करण्यात आलेले आहेत. याच पदपथालगत कपड्यांच्या शेड स्वरूपात गाळे तयार करुन रसवंतीगृहचालकांनी आपली दुकाने थाटली आहेत. पदपथ आणि लगतच्या रस्त्यावर रस काढण्याची मशिन, खुर्च्या आणि टेबले मांडली आहेत. रस पिण्यासाठी ग्राहक वाहने रस्त्यावर लावत असल्यामुळे गर्दी होत आहे. काही हॉटेल, फळविक्रेत्यांनी तर पदपथावर देखील दुकाने थाटली आहेत.

> “संत तुकारामनगर परिसरात नेमक्या किती रसवंतीगृहांना परवानगी दिली आहे ? याची माहिती घ्यावी लागेल. त्या भागात ५ जणांना परवानगी दिलेली आहे. तपासणी करून कारवाई करण्यात येईल.”
>
> **- उमेश ढाकणे, 'ह' प्रभाग क्षेत्रीय अधिकारी, पिंपरी-चिंचवड महापालिका**

### महापालिका, पोलिसांनी केवळ बघ्याची भूमिका...

महापालिका मुख्यालयापासून अगदी हाकेच्या अंतरावर असलेला संत तुकारामनगर परिसर आणि संत तुकारामनगर पोलिस चौकीच्या समोरच रसवंतीगृहचालकांचे गुऱ्हाळ सुरू आहे. पादचाऱ्यांना पदपथ आणि रस्त्यावरून चालण्यासाठी अडचणीतून वाट काढावी लागत आहे. मात्र, महानगरपालिका आणि पोलिसांनी केवळ बघ्याची भूमिका घेतल्यामुळे नागरिकांना मनस्तापाला सामोरे जावे लागते आहे. या पदपथावरील फळांच्या दुकानांमधून वाट काढत पादचाऱ्यांना ये-जा करावी लागत आहे. त्यातच भर की काय ? आता नागरिक आपल्या मोटारीही या पदपथांवर लावत असल्याने आम्ही चालायचे कसे ? असा संतप्त प्रश्न स्थानिक नागरिकांनी उपस्थित केला आहे. पदपथावर अतिक्रमण केल्याने पादचाऱ्यांना चालायला जागाच उरली नाही. विशेषतः लहान मुले, जेष्ठ नागरिक, महिलांना नाइलाजास्तव रस्त्यावरून चालावे लागते. यामुळे अनेकदा अपघात होत आहेत. याची तक्रार नागरिकांकडून महापालिकेकडे केली जातेय, पण दखल घेतली जात नाही. महापालिकेने तातडीने कारवाई करून पदपथ मोकळा करण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

# "हात-पाय बांधून तुम्ही कबड्डी खेळा..."

## काँग्रेसच्या कोंडीबाबत पृथ्वीराज चव्हाणांची मिश्किल टीका : मोदी सरकार रडीचा डाव खेळत असल्याचा आरोप

**पुणे । प्रतिनिधी**

सक्तवसुली संचलनालय (इडी), केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागानंतर (सीबीआय) आता प्राप्तिकर विभागाला हाताशी धरून मोदी सरकारने बँक खाती गोठवून काँग्रेसची आर्थिक कोंडी केली आहे. 'हात-पाय बांधून निवडणूक लढविण्याची कबड्डी खेळा', असे सांगितले जात आहे. सरन्यायाधीशांना वगळून निवडणूक आयुक्तांच्या नेमणुकीचा कायदा बदलून मोदी सरकारने आपल्या मर्जीतील व्यक्तींची आयुक्तपदी नियुक्ती केली. अशा निवडणूक आयोगाकडून काय अपेक्षा करणार?, असा सवाल उपस्थित करून येनकेनप्रकारेण निवडणूक जिंकण्यासाठी मोदी सरकार रडीचा डाव खेळत असल्याचा आरोप माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी शुक्रवारी केला.

काँग्रेस पक्षाच्या प्रचार प्रमुखपदी नियुक्ती झाल्यानंतर काँग्रेस भवन येथे आलेल्या पृथ्वीराज चव्हाण यांनी पत्रकार परिषदेत मोदी सरकारवर टीका केली. पुणे लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार आमदार रवींद्र धंगेकर, शहराध्यक्ष अरविंद शिंदे, माजी आमदार मोहन जोशी, रमेश बागवे, अनंत गाडगीळ, दीप्ती चवधरी, माजी महापौर कमल व्यवहारे, वीरेंद्र किराड या वेळी उपस्थित होते.

चव्हाण म्हणाले की, देशातील प्राप्तिकर कायद्यानुसार कोणत्याही नोंदणीकृत पक्षाला प्राप्तिकर भरावा लागत नाही. मात्र, पक्षाला मिळालेल्या देणग्यांचा ताळेबंद आणि व्यवहार हे पक्षांना व्यवहार निवडणूक आयोगाला सादर करावे लागतात. २०१७-१८ मध्ये काँग्रेसला काही देणग्या मिळाल्या होत्या. केरळमधील पुराच्या घटनेनंतर पक्षाच्या सर्व खासदारांनी देशभरातून



एक महिन्याचा निधी जमा करून पूरग्रस्तांच्या मदतीसाठी पाठविला होता. या गडबडीत पक्षाला मिळालेल्या देणग्यांची माहिती प्राप्तिकर विभागाला द्यायला आठवडाभर उशीर झाला. माहिती उशिरा दिल्याचा दंड दहा हजार रुपये आहे. मात्र, आता आठ वर्षांनी ही बाब कोदून काढत या विषयात आता पक्षाला नोटीस पाठवून २१० कोटी रुपयांचा दंड बजावला आहे. हा दंड भरला नाही म्हणून विभागाने काँग्रेस पक्षाची चार बँकांतील ११ खाती गोठविली आहेत. आता दहा रुपयांचा व्यवहारही आम्हाला करता येणार नाही. विजयाचा आत्मविश्वास गमावलेले मोदी निवडणुकीत आमचा पराभव व्हावा म्हणून हे करत आहेत. ही कसली लोकशाही? सीताराम केसरी खजिनदार असतानाच्या काळात १९९४ मधील त्रुटीची नोटीस पक्षाला बजावण्यात आली आहे. आम्हाला न्याय मिळेल पण तोपर्यंत निवडणुका होऊन जातील त्याचे काय?

> राज्यामध्ये पाच टप्प्यांत निवडणूक होणार आहे. प्रत्येक टप्प्यासाठी ४० स्टार प्रचारक म्हणून यादी जाहीर केली जाईल. सगळी प्रक्रिया पार पाडणार आहोत. दारोदारी जाऊन उमेदवार पोहोचत आहेत. पायाला भिंगरी लावून सगळे काम करत आहेत पुण्यात धंगेकरांचा विजय निश्चित आहे. सांगलीची जागा आमच्याकडे रहावी ही आमची आग्रही मागणी आहे. त्यासंदर्भात चर्चा सुरू असल्याने भाष्य करणे योग्य होणार नाही.विरोधी पक्षाच्या मतांची विभागणी करण्याचे काम मोदींकडून केले जात आहे वंचित बहुजन आघाडीने समजून घ्यावे.
>
> **- पृथ्वीराज चव्हाण, माजी मुख्यमंत्री, काँग्रेस.**




# मुंबई, पुणे, नागपुरात सर्वाधिक अपघात

## अपघाती मृत्यूच्या संख्येतही वाढ

**पुणे । प्रतिनिधी**

केंद्र व राज्य शासन प्रत्येक वर्षी अपघात नियंत्रणासाठी रस्ता सुरक्षा सप्ताह, महिना असे उपक्रम राबवत कोट्यवधींचा खर्च करते. त्यानंतरही राज्यातील चार शहरांची तुलना केल्यास सर्वाधिक अपघात मुंबई, पुणे, नागपूर शहरात झाल्याचे पुढे आले आहे. या अपघातात मोठ्या संख्येने मृत्यूही झाले आहेत.

राज्यातील नागपूर शहर, पुणे शहर, मुंबई शहर, छत्रपती संभाजीनगर या चार शहरांची आकडेवारी माहितीच्या अधिकारातून सामाजिक कार्यकर्ते अभय कोलारकर यांनी पुढे आणली आहे. अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य मुंबई कार्यालयाच्या नोंदीनुसार चारही शहरांमध्ये अपघात व मृत्यूसंख्या एकत्र केल्यास १ जानेवारी २०२३ ते २९ फेब्रुवारी २०२४ दरम्यान ६ हजार ४९७ अपघात झाले. या अपघातात १ हजार ४५५ नागरिकांचा मृत्यू झाला.

# वादग्रस्त लवासा सिटी प्रकल्प घेणाऱ्या कंपनीवर 'ईडी'च्या धाडी!

## मुंबईतील डार्विन ग्रुप कंपनी अडचणीत : कारवाईत 78 लाखांची रोकड

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील पहिले खासगी हिल स्टेशन म्हणून लवासा सिटी प्रकल्पाची निर्मिती करण्यात आली. हा प्रकल्प विविध कारणांमुळे चांगलाच चर्चेत आला होता. वादग्रस्त लवासा सिटी प्रोजेक्ट विकत घेणाऱ्यावर अंमलबजावणी संचालनालय (ED) धाडी टाकल्या आहेत. दिवाळखोरीत निघालेला लवासा प्रकल्प अजय सिंग यांच्या डार्विन कंपनीने विकत घेतला होता. ईडीच्या दिल्ली विभागीय कार्यालयाकडून त्यांच्यावर कारवाई करण्यात आली. या कारवाईत ७८ लाखांची रोकड आणि २ लाख रकमेची विदेशी रोकड जप्त करण्यात आली.

**कसा आहे लवासा प्रकल्प**

ईडीच्या दिल्ली येथील



पथकाने लवासा सिटी प्रकल्प घेणाऱ्या डार्विन कंपनीवर छापेमारी केली. या छापेमारीत काही आक्षेपार्ह कागदपत्रे आणि रोकड जप्त करण्यात आली. पुणे जिल्ह्यातील मुळशी तालुक्यात लवासा प्रकल्प उभारण्यात आला आहे. १२ हजार ५०० एकर जमिनीवर देशातील पहिला खासगी हिल स्टेशन उभारण्यात आले आहे. हिंदुस्तान कन्स्ट्रक्शन कंपनीकडून उभारण्यात येणारा हा प्रकल्प अडचणीत आला. त्यानंतर हा प्रकल्प घेण्यासाठी डार्विन कंपनी पुढे आली.

**1,814 कोटी रुपयांची बोली**

मुंबईतील डार्विन ग्रुपने लवासा घेण्यासाठी 1,814 कोटी रुपयांची बोली लावली. परंतु हा प्रकल्प दिवाळखोरीत गेला असल्यामुळे त्याला एनसीएलटीची (नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्युनल) मंजुरी हवी होती. एमसीएलटीने मंजुरी दिल्यानंतर डार्विन ग्रुपने हा प्रकल्प जुलै 2023 मध्ये घेतला. या प्रकल्पाचा व्यवहार झाल्यानंतर डार्विन ग्रुप आठ वर्षात १ हजार ८१४ कोटी रुपयांची भरपाई बँक आणि घरे घेणाऱ्यांना देणार आहे. बँकांची ९२९ कोटी रुपये थकबाकी आहे. तसेच घर खरेदी करणाऱ्या लोकांना ४३८ कोटी रुपयांची भरपाई देण्यात येणार आहे.